मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील
कार्यालयांतर्फे घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षांसाठी
अवलंबिण्यात यावयाची कार्यपध्दती..

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्रमांक : परीक्षा-१०८९/प्र.२३/८९/१७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ ऑक्टोबर,१९८९.

**परिपत्रक**

शासनाकडे अशी तक्रार करण्यात आली आहे की, निरनिराळया विभागांतर्फे ज्या विभागीय परीक्षा घेण्यात येतात त्या परीक्षेत मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना योग्य गुण देण्यात येत नाहीत व त्यामुळे बरेचसे मागासवर्गीय कर्मचारी या परीक्षांत अनुत्तीर्ण होतात. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना केवळ आकसाने किंवा हेतुपुरस्सर अनुत्तीर्ण करण्यात येऊ नये, त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी त्यांच्यातर्फे घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षांसाठी वापरण्यात येणाऱ्या उत्तरपत्रिकांवर उमेदवारांचे नाव, जात इत्यादी बाबींचा उल्लेख टाळून फक्त आसन क्रमांक, परीक्षेचे नाव, विषय, दिनांक व पेपर क्रमांक ( भाग ) एवढयाच बाबींचा उल्लेख करावा. तसेच सदर उत्तरपत्रिका परीक्षकांकडे तपासण्यासाठी पाठवितांना त्यावर मूळ आसन क्रमांक न देता त्यांना संकेतांक ( Code Number ) देण्यात यावेत.

२. सर्व मंत्रालयीन विभागांनी वरील आदेशांचे कटाक्षाने पालन करावे व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख यांनाही त्याप्रमाणे सूचना द्याव्यात व त्यांचे कटाक्षाने पालन होण्याबाबत दक्ष रहावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( भा. म. भणगे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाजांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
शासनाचे सर्व सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्यायशाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभाग/का.क्र.१६-ब,
निवड नस्ती.

*पत्राने.